
# डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर
## राज्यशास्त्र विभाग
## व्यष्टी अध्ययन
## दिनांक- ५/०२/२०२४

- व्यष्टी अध्ययन उद्दिष्टे -
- एखाद्या व्यक्ती, परिस्थिती किंवा गटाची वैशिष्ट्ये अचूकपणे चित्रित करणे
- विषय आणि त्याच्या संबंधित परिस्थितीबद्दल गहन बोध मिळवणे

सहभागी विद्यार्थी- 15
व्यष्टी अध्ययन व्यक्ती- ज्योती रामजी बुधबावरे
वय : ६५ वर्ष
व्यवसाय- मजुरी
पत्ता- अजनी चुनाभट्टी, वर्धा रोड नागपूर


CASE STUDY
Date - 05.02.2025

1) Yachika S. Kotangale
2) Badal N. Meshram
3) Vanshika A. Dadmal
4) Shrijal S. Choudhari
5) Kunal B. Khare
6) Mrunali B. Sonule
7) Anup S. Lanjewar
8) Shubham S. Tembhare
9) Gunjan M. Purwatkar
10) Sanvane Om
11) Masum A. Budhbawane
12) Manasvi S. Dambe
13) Sonvane Om

**सामान्य स्त्रीची असामान्य कथा**

राज्यशास्त्र विभागातर्फे बी. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी व्यष्टी अध्ययन केले. या अध्ययनात सौ. ज्योती रामजी बुधबावरे यांची भेट घेतली. मजुरी करीत असलेल्या ज्योती बाई यांनी केलेला जीवनसंघर्ष विद्यार्थ्यांनी जाणून घेतला. व्यसनाधीन नवरा आणि सहा मुलांचे संगोपन ज्योतीबाईसाठी फार कष्टप्रद होते. आई, बहीण, पत्नीची भूमिका पार पाडत कौटुंबिक जबाबदारी समर्थपणे पेलत असेलेल्या ज्योतीबाई फार हिम्मतवान आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रिया पुरुषांवर अवलंबून असल्याने त्यांना स्वतःचा निर्णय घेण्याचा फारसा अधिकार नाही .त्यामुळे आजही त्यांचे स्थान नगण्यच असल्याने त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होताना दिसतो .ज्योतीबाईना सुद्धा या अन्याय अत्याचाराचा सामना करावा लागला. कधी सासरच्या माणसांनी छळळे तर कधी माहेरच्या. कधी समाजातील पुरुषांच्या विखारी नजरानी सतत असुरक्षित जीवन ज्योतीबाइच्या वाट्याला आले. मिळेल ते काम करून ज्योतीबाईनी मुलाबाळांना मोठे केल. कामानिमित्य ज्योतीबाई सारख्या बाहेर राहत असत. त्यामुळे झोपडपट्टीतील सामाजिक जीवनाचा अत्यंत वाईट परिणाम त्यांच्या मुलांवर झाला. आज ज्योतीबाईंचा एक मुलगा एका खून खटल्यात तुरुंगात आहे. त्याच्या तीन मुलींचं संगोपन ज्योतीबाई करत आहे. या तीन मुलांना ज्योतीबाई चांगल्या दर्जाचे शिक्षण देण्यासाठी वाटेल ते कष्ट करण्यात कोणताही मान अपमान समजत नाही. ही तिन्ही मुले पदवी चे शिक्षण घेत आहेत.

ज्योतीबाईचे जीवन जाणून घेताना विद्यार्थांनी अनेक प्रश्न विचारले. या प्रश्नातून त्याना त्यांना त्यांच्या सभोवताल असलेल्या कष्टकरी स्त्रीयांना समजून घेता आले. जिद्दीने स्वाभिमानाने जगण्याच्या प्रेरणा यावेळी विद्यार्थ्यांना मिळाल्या. शेवटी जाताना विद्यार्थी भावूक नजरेने ज्योतीबाईकडे बघत स्वतःच्या जीवनातील आनंद व सुखाच्या मार्गाची वाट धरणारा वाटसरू होण्याचे स्वप्न डोळयात घेऊन निघाला.








R. AMBEDKAR COLLEGE
DEPARTMENT OF ENGLISH
ENGLISH LITERARY ASSOCIATION
F-1
110
HCLFoundation
Yuvakendra
(Youth Empowerment Centre)




G-F
04



व्यष्टी अध्ययन उपक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना दिल्या शुभेच्छ